# प्रकरण पहिले

# क्रांतीवीर नागनाथ (आण्णा) नायकवडी यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय

प्रस्तावना -

१७ व्या शतकामध्ये हिंदूस्थानच्या भूमीवर परकीयांचे व्यापाराच्या निमित्ताने संबंध वाढू लागले. तेव्हा ब्रिटिश, पोर्तुगीज, डच लोकांचे आचार, विचार यांचा प्रभाव हिंदू जनतेवर जाणवू लागला. परकीय व्यापार करता करता राज्यकारभारामध्ये सहभागी होऊ लागले. त्यामुळे भारतीयांच्या मनात यांच्या विषयी चीड निर्माण झाली. परंतु ब्रिटिशांनी हिंदूस्थानच्या भूमीवर चांगलेच वर्चस्व निर्माण केले. त्यामध्ये १७५७ च्या प्लासीच्या लढाईतील बंगालच्या नवाबावर लॉर्डक्लाईव्हच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांनी विजय मिळविला. या कालखंडापासून परकीयांना हिंदूस्थानात सत्ता मिळाली. या सत्तेच्या जोरावर भारतात त्यांच्या कंपन्या स्थापन करू लागले. हिंदूस्थानातील कच्चा मालावर इंग्लंडमध्ये प्रक्रिया करून पुन्हा भारतीय बाजारपेठेत जास्त दराने विक्री करू लागले. या धोरणामुळे भारतीय जनता बंड करून उठली. यामुळे १७५७ ते १८०० या कालावधीत भारतीय जनता ब्रिटिशांच्या विरोधात उभी राहिली. परंतु हा विरोध तसा प्रभावी नव्हता. १८०० ते १८५७ या कालावधीत भारतीयांना ब्रिटिशांची मक्तेदारी नकोशी वाटू लागली. '१८५७ पर्यंत ब्रिटिशांनी आपला विस्तार करण्यासाठी व ईस्ट इंडिया कंपनीच्या नावे कारभार करण्यासाठी त्यांचा वेळ खर्ची पडला. १८५७ मध्ये ब्रिटिश लष्करामधील भारतीय सैनिक, सत्ता गमावून बसलेले पूर्वीचे राजे रजवाडे, त्यांचे वारस आणि मुख्यत: उत्तर भारतातील शेतकरी, कारागीर यांचे लोकसमूह यांनी संयुक्तपणे ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन भारतीयांची सत्ता पुन्हा स्थापन करण्याचा पहिला संघटित सशस्त्र राजकीय उठाव केला.'[१] या उठावामध्ये शेतकऱ्यांच्या चळवळी, लष्करातील उठावकर्ते सैनिक असा दोघांचा संयोग होवून लढा उभा केला. यामध्ये झाशीची राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब, कन्वरसिंग, अहमद उल्लाह, तात्या टोपे इत्यादींनी उल्लेखनीय कामगिरी केली. यामध्ये भारतीय सैनिकांना पराभव पत्करावा लागला. ब्रिटिशांच्या भारतातील राज्यकारभाराला खिळ बसविण्याचा प्रयत्न या बंडामुळे झाला.

पुढे भारतीय जनतेची ही चाल ओळखून ब्रिटिशांनी संपूर्ण लष्कराचे नूतनीकरण करण्यास सुरूवात केली. एका बाजूला जातीय व दुसऱ्या बाजूला धार्मिक आधारावर लष्कराचे विभाजन केले. याचा

अर्थ ब्रिटिशांना लष्करातील जवान ब्रिटिशांची चाकरी हेच आपले ध्येय मानतील हा कुटिल डाव करून भारतीय जवानांना समाजापासून अलग केले. त्याच वेळी अनेक जवानांनी या ब्रिटिशांच्या कृत्याला विरोध केला. या काळात राष्ट्रवादी भावनांचा प्रसार मोठ्या प्रमाणात चालू होता.'राष्ट्रवादाच्या प्रेरणेने अनेकांनी ब्रिटिश साम्राज्य उलथवून टाकण्यासाठी गुप्त मसलती सुरू केल्या होत्या. तसेच अनेक उठावही घडून आले. उदा. १८७४ चा 'पबना' येथील शेतकरी उठाव, १८७६ मधील 'दरखण' येथील दंगल, १८७९ मधील वासूदेव बळवंत फडके यांनी केलेला उठाव असे विविध उठाव होत होते. या कालावधीमध्ये १८८५ साली राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना करण्यात आली.' [२]

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापने नंतरचा काळ हा वेगळाच ब्रिटिशांनी तयार केला. १९०७-१९०८ मध्ये पंजाबच्या फाळणीविरूध्द पंजाबमध्ये सामुदायिक चळवळ सुरू करण्यात आली होती. त्याचे पर्यावसन सरदार अजितसिंग, लालालजपतराय व इतर नेत्यांना अटक करण्यात आली होती. अशा प्रसंगी पंजाबमध्ये शीखांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला. स्वातंत्र्याचा विचारही धुमसत होता. रामजीकृष्ण वर्मा, डॉ. तारकानाथदास, स्वा. सावरकर, हरदयाळ इत्यादींनी भारतामध्ये क्रांती होणे आवश्यक आहे, हे 'The Indian Sociologist' या मासिकातून जगापुढे त्याचा प्रसार करीत होते. १९०९ च्या दरम्यान युरोपमध्ये पहिल्या महायुध्दाच्या जाणीवा स्पष्ट होत होत्या. अटक केलेल्या नेत्यांची सुटका करण्यात आली. या नेत्यांमध्ये अरविंद घोष, डॉ. जदू गोपाल मुखर्जी, डॉ. जी. डी. सावरकर यांचा समावेश होता. या नेते मंडळीनी महाराष्ट्रामध्ये एक संपर्क केंद्र सुरू केले आणि क्रांतीकारी संघटना उभारण्यासाठी तरूण युवकांना जमा करू लागले. याचवेळी देशात महाराष्ट्राप्रमाणे गुजरात, उत्तरप्रदेश या ठिकाणीही अशा स्वरूपाच्या क्रांतीकारी कारवायांना सुरूवात झाली.

प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये सातारा जिल्हा या कार्यात अग्रेसर होता. भारताच्या इतिहासापासून महाराष्ट्राचा इतिहास अलग करून समजता येणार नाही. छत्रपति शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली सातारची भूमी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात अग्रेसर होती. या लढ्यामध्ये १९०१ ते १९१० पर्यंत जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांनीही सक्रिय भाग घेतला. यामध्ये कोरेगांवचे नारायण हरी आपटे सशस्त्र बंड करून इंग्रजांना दहशत बसविण्यात अग्रभागी होते. या कालावधीमध्ये दादासाहेब करंदीकरांनी 'शेतकरी संघ' स्थापन केला. 'औद्योगिक परिषद' स्थापन झाली. अशा वेळी सातारा जिल्ह्यामध्ये महादेव रामचंद्र हिंगे यांनी 'क्रांतीसंस्था' स्थापन केली. अशा समर प्रसंगी १९०० साली

क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म झाला. १९१७ ला जिल्ह्यात होमरूळ लीगच्या शाखा स्थापन झाल्या व जिल्ह्याभर जागृती मिर्माण झाली. १९१९ ला वाईस 'स्वराज्य' परिषद झाली. ११ आक्टोबर १९२० ला सातान्याला असहकाराच्या प्रचारासाठी पहिली सभा झाली. ६-७ नोव्हेंबर १९२० ला महात्मा गांधी सातारा जिल्ह्यात उपस्थित होते. १९२१ साली संपूर्ण जिल्हा असहकारमय झाला. १९२५ ला सत्यशोधक समाजाचे बी जिल्हाभर रूजले. तसेच मध्यंतराच्या काळात अशा विविध कारवाया चालू होत्या. १९२७ ला रामभाऊ मोडक यांच्या नेतृत्वाखाली 'सेवादल' स्थापन झाले.१० जुलै १९२७ ला वाईस 'सेवादल' स्थापन झाले. २२ मार्च १९२७ ला तासगांवला स्थापन झाले. ३ फेब्रुवारी १९२९ ला पहिला स्वातंत्र्य दिन पाळून प्रतिज्ञावाचन केले. २ नोव्हेंबर १९२९ ला सुपने येथे खादी भांडार उघडले. १९३० ला तासगांवचे 'चहाचे दुकान' परदेशी बहिष्कारासाठी बंद केले. १ जुलै १९३० ला बिळाशीचे बंड झाले. २१ जून १९३० पासून वाळवे तालुक्यात बहिष्कार सप्ताह पाळला गेला. १२ मार्च १९३० ला पांचगणीला नगरपालिकेच्या दीपस्तंभावर राष्ट्रीय झेंडा फडकविला. १८ मार्च १९३२ ला कराडमध्ये 'अस्पृश्यता निवारण' परिषद भरली. २० सप्टेंबर १९३२ ला ओगलेवाडी व बऱ्याच ठिकाणी हरिजनांना मंदिरप्रवेश मिळाला.' [३]

परिषदा, चळवळी, बहिष्कार, अस्पृश्यता निवारण, हरिजनांना मंदिर प्रवेश अशा विविध कारवाया महात्मा गंधीजींच्या नेतृत्वाखाली चालू होत्या. महात्मा गांधींच्या विचाराने महाराष्ट्रातील अनेक नेते भारावून गेले. सातारा जिल्ह्यातील वाई, वाळवा, कराड (कुंडल), तासगांव या तालुक्यातील नेते मंडळींनी आपल्या कार्याचे योगदान दिले. स्वातंत्र्याच्या विचाराने पेटून उठले. काहींनी शिक्षण, नोकरी, घरदार सोडून स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाले.

वास्तविक यामध्ये येडेमच्छिंद्र गांवचे नाना पाटील अग्रक्रमाने पुढे आले. याचबरोबर किसनवीर, पदमाळचे वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, जी. डी. (बापू) लाड, नागनाथ (आण्णा) नायकवडी, बर्डे मास्तर इत्यादी अनेक शेतकरी कुटुंबातील लोक सहभागी झाले. या सहभागाला महत्वाचे कारण म्हणजे शिक्षण घेणारी तरूण मंडळी बंडखोर प्रवृत्तीची, स्वतंत्र्यवृत्तीची, स्वाभिमानी होती. यावेळी वाळव्याचे नागनाथ आण्णा हे कोल्हापूरात शिक्षण घेत होते. आण्णांना शिक्षणात राम वाटेना. अशा वेळी महात्मा गांधीनी क्रांतीचे लोण खेड्या-पाड्यांपर्यंत पोहोचविले. स्वातंत्र्य, श्रमफळाचा उपभोग व आयुष्यातील आवश्यक गोष्टी मिळविण्याचा हक्क हिंदी लोकांना असूनही ब्रिटिश सरकारने त्यांचा आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व नैतिक अध:पात केला आणि देशाला दिवाळखोर केले. अशा आशयाचे पत्रक राष्ट्र सेवादलाने काढले आणि ते देशभर

वाटले. सदर दिवशी सभा व मिरवणुका घ्यावयाच्या असे ठरले तेव्हा अशा परिस्थितीत विद्यार्थीदशेत असणारे तरूण शांत कसे बसतील. नागनाथ आण्णांचे व्यक्तिमत्त्व मुळातच बंडखोर, स्वाभिमानी वृत्तीचे, गुलामगिरीत राहणे हे त्यांना मानवणारे नव्हते. नोकरी, चाकरी म्हणजे लाचारी त्यामुळे तिच्या मोहपाशात ते कधीच पडले नाहीत. त्यांचा पिंड स्वातंत्र्य सैनिकांचा होता. अशा वेळी त्यांना हुतात्मा भगतसिंग यांची प्रेरणा मिळाली आणि ते स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले.

९ ऑगस्ट १९४२ ला मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर काँग्रेस च्या अधिवेशनात 'छोडो भारत' आणि 'करेंगे या मरेंगे' या घोषणा झाल्या आणि देशभर जोरदार वादळ उठले. त्याची पर्श्वभूमी नागनाथ आण्णांच्या जन्मापासूनच तयार झाली. यामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांचा सहभाग प्रामुख्याने महत्वाचा होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचाराचा, कार्याचा प्रभाव खऱ्याअर्थाने वाळवा, तासगाव, कराड, मिरज, पाटण, माण इत्यादी तालुक्यामध्ये निर्माण झाला. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीचे वारे प्रत्येक गावागावात पोहोचले.

'१९४२ च्या प्रतिसरकारमध्ये धाडसी पध्दतीने भाग घेणारी तरूण पिढी २०-२२ वर्षांची होती. याच पिढीतील नागनाथ नायकवडी पुढे 'क्रांतीवीर' नागनाथ (आण्णा) नायकवडी' म्हणून प्रसिध्द झाले.' [४] आण्णा त्यावेळी कोल्हापूरमध्ये प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मध्ये शिक्षण घेत होते. त्या तरूण मनावर या चळवळीचा प्रभाव पडला. कोल्हापूरमध्येही अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले. त्याकाळी स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी ही या चळवळीत सहभागी झाले. राष्ट्र सेवादलाची चळवळही येथे पर्यंत पोहोचली. या विविध मार्गांनी नागनाथ आण्णांच्या मनावर प्रभाव पडत होता. आण्णांना स्वातंत्र्य चळवळीबाबत आकर्षण वाटू लागले. त्याचे कारण ब्रिटिशांची सत्ता आपल्या देशावर आहे. लोकांची पिळवणूक करीत आहेत. यांना आपल्या देशातून घालविल्याशिवाय शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी सुखी होणार नाही. ब्रिटिशांची सत्ता घालविण्यासाठी जीवाची बाजी लावली पाहिजे. अशा विचाराने आण्णा भारावून गेले. तसेच शाहु महाराजांच्या विचार, आचार, व्यवहाराने त्यांच्या मनावर प्रभाव पडला आणि आण्णांचे खरे क्रांतिकारी व्यक्तिमत्व कोल्हापूरमध्ये घडले. त्याचबरोबर त्यांच्या मातोश्री क्रांतिविरांगणा कै. लक्ष्मीबाई नायकवडी यांचे क्रांतिकार्याला प्रोत्साहन मिळाले. हुतात्मा भगतसिंगच्या मार्गदर्शनाखाली व महात्मा गांधी यांच्या आचार-विचाराने नागनाथ आण्णांच्या कार्याची विचारसरणी बदलली.

नागनाथ आण्णा महात्मा गांधीना देव मानत. गांधीजींच्या विचारसरणीतून अभिप्रेत असणाऱ्या आधुनिक महाराष्ट्राचे स्वप्न बाळगले असे म्हणावयास हरकत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक हुतात्मे झाले. अनेकांनी संसार सुखाचा त्याग केला. त्यांच्या मनिषा पूर्णत्वाला नेण्याचे कार्य आण्णांनी हाती घेतले. ते कार्य पूर्णत्वाला नेण्याची पूर्णतयारी असणारे कर्तृत्ववान क्रांतीवीर नागनाथ (आण्णा) नायकवडी हे सांगली जिल्ह्यातील वाळवे गावचे महान सुपुत्र आहेत. सांगली, सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या जनआंदोलनात नेतृत्व करणारे, समाजकारण, राजकारण, नैतिक तत्वांना आचार, विचारांची दिशा देणारे एक पाईक आहेत. आण्णांची स्वातंत्र्य पूर्वकाळात स्वातंत्र्यासाठी मरण्याची तयारी होती. त्यावेळी जनतेच्या स्वातंत्र्याशिवाय दुसरे काही मिळवावयाचे नव्हते. आज ही जनतेच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याशिवाय दुसरे काही मिळवायचे नाही असे ध्येयवादी त्यांचे व्यक्तिमत्व आहे.

या महान विराचे कर्तृत्व अभ्यासत असताना पहिल्या प्रकरणात क्रांतीवीर नागनाथ (आण्णा) नायकवडी यांचे व्यक्तिमत्वाच्या विकासाला कारणीभूत ठरलेल्या घटकांचा विचार करावयाचा आहे. आण्णांचा जन्म, बालपण, शिक्षण, त्यांच्यावर झालेले क्रांतिसिंह नाना पाटील यांचे संस्कार, आण्णांची विचारसरणी इत्यादींचा येथे विचार करण्यात आला आहे. तसेच मातोश्री क्रांतिविरांगणा कै. लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी यांनी केलेले मार्गदर्शन याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. क्रांतीवीर नागनाथ आण्णांचे व्यक्तिमत्व आणि कार्य 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले ।' याप्रमाणे आहे. त्यासाठी प्रथम त्यांचे व्यक्तिमत्व कसे उदयाला आणि विकास कसे पावले याचे सविस्तर विवेचन पुढील प्रमाणे केलेले आहे.

**नागनाथ आण्णांचा जन्म व बालपण –**

दलदलीतून ज्या प्रमाणे कमळाचे फुल जन्माला येते. त्याप्रमाणेच महाराष्ट्राच्या भूमीमध्ये अनेक शूरवीर, क्रांतिकारक, संत, महात्मे जन्माला आले. यामध्येच राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी ७७ वर्षांपूर्वी सांगली जिल्ह्याने महाराष्ट्राला एक तेजस्वी, क्रांतिकारक नेता दिला. या महान क्रांतिकारकाचे नावे आहे मा. जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक, क्रांतीवीर नागनाथ नायकवडी. आज महाराष्ट्रातील संपूर्ण जनता त्यांना ''आण्णा'' म्हणून ओळखते.

छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या सांगली जिल्ह्यात क्रांतीची मशाल कायम तेवत ठेवणाऱ्या वाळवा, कुंडल, तासगांव, इस्लामपूर या प्रमुख गांवी अनेक तळागाळातील शेतकरी घराण्यातील तरूणांनी या क्रांतिकारी चळवळीत भाग घेतला. भारत भूमिच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आणि स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्यासाठी अनेक क्रांतीवीर जन्माला आले. सांगली जिल्ह्यातील वाळवे या ऐतिहासिक व निसर्गाची साथ असणाऱ्या गावात व्यवसायाने शेतकरी कुटुंबात १५ ऑगस्ट १९२२ रोजी क्रांतिविरांगणा माता सौ. लक्ष्मीबाई यांच्या पोटी नागनाथ (आण्णा) जन्मास आले. श्री. रामचंद्र नायकवडी हे त्यांच्या वडिलांचे नांव होय. नागनाथ आण्णांच्या मातोश्रींचे वडील पोलिस खात्यात जमादार होते. ते मिरजवाडीचे होते. आई वडीलांचे घराणे शूर असल्यामुळे शेतकरी घराण्यातील कष्टकरण्याची मातोश्रींच्या घराण्यातील वीर वृत्तीची जुळवणी झाली. 'परंतु लक्ष्मीबाईंचा खरा पिंड राजकारणी होता. त्यामुळे त्यांनी आपल्या मुलाला देशसेवा, राजकारण या संस्काराने घडविले. लक्ष्मीबाईंनी मारूतीला नवस-सायास करून नागनाथ मुलगा मागुन घेतला.' [५]

क्रांतिवीरांना लहानपणा पासूनच आईने समाजसेवा, देशसेवा, अन्यायाविरूध्द बंड करणे याचे बाळकडू पाजले. तो पूर्वीचा पारतंत्र्यातील काळच असा होता की, मुल जन्माला आले की त्याला बालपणीच भारत देशाच्या स्वातंत्र्याबद्दल जाणीव होईल. प्रत्येक आई-वडील आपल्या मुलाला सरकारी नोकरी, पैलवान किंवा मोठा वीर होण्याचे ध्येय मनी बाळगत होती. ज्याप्रमाणे कुंभार मातीला मडक्याचा आकार देतो त्याप्रमाणे क्रांतीमाता लक्ष्मीबाईने नागनाथ (आण्णा) ला देश सेवेचे व्रत अंगी बाणण्याचा ध्यास त्यांच्या बालपणी घेतला. नागनाथ आण्णा लहानपणापासूनच वाळव्याच्या राष्ट्रसेवादलात काम करावयाचे. दलित वस्तीतून रस्ते झाडणे, स्वच्छता करणे यामध्ये आण्णा आघाडीवर असायचे. पण त्यांच्या या कामास वडिलांचा विरोध होता. कुस्तीगीर व्हावे, शाळा शिकावी अगदीच नाही तर घरच्या शेतीत काम करावे असे त्यांना वाटे. पण वडिलांचे स्वप्न हे नियतीने खोटे ठरविले. नागनाथ आण्णा बालपणीच क्रांतिसिंहाच्या विचाराने प्रेरित झाले. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाने वागण्याचे संस्कार बालवयात झाले. नागनाथ आण्णा शाळा सोडून चळवळीत कार्य करू लागले. आपला मुलगा वाया गेला म्हणून वडिल त्यांना चळवळीत सहभागी होण्यास विरोध करीत. परंतु जन्मापासून बालपणातच काय तर त्याचे बरेच जीवन हे आईच्या मार्गदर्शनाने चालले. वडिलांनी जरी कार्यास विरोध केला तरी आईने मनापासून, जिद्दीने नागनाथ आण्णांना मातृ वात्सल्य दिले.

**क्रांतिसिंह नाना पाटील यांची नागनाथ आण्णांच्या बालपणातील पहिली संस्कारभेट –**

नागनाथ आण्णांच्या बालपणी नाना पाटील वाळवे गावी येत. कारण नाना पाटील हे कष्ट करणाऱ्या, शेतकरी घराण्यातील व्यक्ति स्वातंत्र्याच्या प्रेमाने भारावून गेलेले होते. महात्मा गांधीजींच्या विचाराने त्यांना वेगळेच वळण दिले. अशा वेळी 'काँग्रेसची स्वातंत्र्याची चळवळ खेड्यापाड्यात पोहोचायला सुरूवात झाली. कष्ट करणाऱ्या जाती-जमातीमधील जनता चळवळीमध्ये सहभागी होऊ लागली. १९२०-३० सालापासून नाना पाटील यांच्यासारखे कष्ट करणाऱ्या शेतकरी समाजातील नेते चळवळीतून आकार घेऊ लागले. अत्यंत हाल-अपेष्टा सहन करून त्यांनी गावोगावी जागृती वाढवायला सुरूवात केली.' [६] त्याचवेळी वाळवे गांवी आले असताना नागनाथ आण्णांची व त्यांची हळूहळू गुरू-शिष्य नात्याने ओळख झाली.

नागनाथ आण्णा कोल्हापूरला शिक्षण घेण्यासाठी आले असताना प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींगमध्ये राहण्याची, जेवणाची मोफत सोय झाली. राजाराम हायस्कूलमध्ये दहावी पर्यंत शिक्षण घेतले. हे शिक्षण घेत असताना आण्णांच्यावर महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा परिणाम झाला. बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवले याची ही जाणीव झाली. 'त्याकाळी कोल्हापूरला राजर्षि शाहू महाराजांनी प्रत्येक बहुजन जाती-जमातीसाठी वसतिगृह काढून गरीब घरातील मुलांना शिक्षणाची दारे जास्त खुली केली. सर्वदूर महाराष्ट्रातील असंख्य विद्यार्थी या सोईचा लाभ घेऊन कोल्हापूरमध्ये शिकायला येत. नागनाथ आण्णा यांप्रमाणेच कोल्हापूरच्या प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मध्ये दाखल झाले. त्याकाळी मराठी समाजातील गरीब, कष्टकरी, घरातील मुलांसाठीचे मोफत वसतिगृह होते. स्वत:ची खोली क्रमाने स्वत: सारवायची, जेवलेली ताटे स्वत: धुवायची, कोल्हापूर मधील सामाजिक जाणीव असलेल्या अनेक घरांमध्ये ठरलेल्यावारी जेवायला जायचे अशी या बोर्डिंगची पध्दत होती.' [७] आण्णा अशा सामाजिक जाणीव असलेल्या त्यांच्या विचारांचे संस्कार आण्णांच्या कोवळ्या मनावर झाले. वातावरणात राहिलेले असल्यामुळे त्यागी वृत्ती वाढली. याचा महत्वाचा फायदा असा झाला की आण्णांच्या मनात स्वातंत्र्यविषयी प्रेम निर्माण झाले. 'आपला देश गुलाम आहे. इंग्रजांचे राज्य घालविल्याशिवाय आपल्या देशातील बहुसंख्य असलेली कष्टकरी जनतेची दु:खे संपणार नाहीत. या देशातून ब्रिटिशांची सत्ता घालविण्यासाठी जिवाची बाजी लावली पाहिजे.' [८] या

विचारांनी आण्णांचे मन भारावून जाईल असे शिक्षण त्यांना मिळाले. त्याचवेळी विविध गांवातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील मित्रमंडळींचा सहवास त्यांना मिळाला.

**नागनाथ आण्णांचे शिक्षण –**

आई-वडिलांच घराणं शूरांच होतं. या शूर घराण्यातं आण्णांच्या शेतकरी घराण्यातील कष्ट, श्रम करण्याची व मातोश्रींच्या घराण्यातील वीरश्रीच्या गुणांचा संगम झाला. लक्ष्मीबाईनी मारूतीला नवस-सायास करून देशसेवेसाठी 'नागनाथ' मुलगा मागून घेतला. या मुलाला आईने लहानपणापासून राजकारणाचे धडे, समाज सेवा, देश सेवा, अन्यायाविरूद्ध बंड इत्यादींचे शिक्षण दिले. मुळातच हुशार, चाणाक्ष बुध्दीचे आण्णांचे प्राथमिक शिक्षण वाळवे या गांवी झाले. आण्णांचे पाचवी इयत्ताही वाळवे या गांवी पूर्ण झाली. मातोश्रींच्या शैक्षणिक आवडीमुळे त्यांचे पाचवी पर्यंतचे शिक्षण घरच्या वातावरणात झाले. त्यामुळे शिक्षण घेण्यामध्ये त्यांचा उत्साह वाढत होता.

आण्णांच्या मधील वाढता उत्साह, शिक्षणातील प्रगती आई-वडिलांनी पुढील शिक्षणासाठी त्यांना आष्टा शाळा नं. १ मध्ये घातले. घरची परिस्थिती तशी सर्वसाधारण होती. याचा परिणाम म्हणजे आण्णांच्या मधील जिज्ञासावृत्ती वाढीस लावण्यास मदत झाली. सहावी-सातवी चे शिक्षण आष्ट्यात फार त्रासाने शिकावे लागले. त्यावेळी बहुजन समाजातील शैक्षणिक वातावरण तसे बेताचेच होते. त्या परिस्थितीला तोंड देत आण्णांनी सहावीचा वर्ग ओलांडला. मात्र, नागनाथ (आण्णा) नायकवडी सातवीच्या वर्गामध्ये गेल्यावर त्याच्या बुध्दीला, ज्ञानाच्या कक्षेला एक विधायक वळण मिळाले.

**शिराळचे शिक्षक ह. ग. नवांगुळ (गुरूजी) –**

स्वातंत्र्याच्या प्रेमाने भारावून गेलेले शिक्षक. त्यावेळी स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रीय भाग घेत असत. आपल्या शिष्यांना देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, समाजसेवा, गरीबाबद्दल प्रेम आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या गुरुशिष्याची परंपरा होती. त्याच पारंपरिक वातावरणात आण्णांचे शिक्षण सातवीच्या वर्गात चालू होते. ''गुरुविण कोण दाखविल वाट''. हे जसे गीत आहे त्याप्रमाणे नागनाथ (आण्णा) नायकवडी यांना योग्य मार्गदर्शन करणारे गुरू भेटले. गुरूगृही राहून आण्णांनी ह. ग. नवांगुळ गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली १९४० साली सातवी पास झाले. त्यावेळी सातवीच्या सेंटर परिक्षेला फार महत्त्व होते. नागनाथ आण्णांचे सहावी-सातवीचे शिक्षण हे आष्टा या गांवी झाले. ह. ग. नवांगुळ गुरूजीनी त्यांच्या मनात

देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, समाजसेवा व इंग्रज सरकारचा अन्याय या गोष्टी त्यांच्या हृदयात खोलपर्यंत रूजविल्या. त्यामुळे आण्णांनी पुढचे शिक्षण घेण्याची जिद्द वाढली. शिक्षणाबद्दल आत्मीयता वाढली. नागनाथ आण्णा इंग्रजी शिकण्यासाठी पुढे कोल्हापूरला आले.

## प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग मधील मित्रमंडळी –

क्रांतीवीर नागनाथ (आण्णा) नायकवडी कोल्हापूरला बोर्डींगमध्ये राहात असताना त्यांना सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक मित्रमंडळींचा सहवास लाभला. त्याकाळी स्वातंत्र्य चळवळीचा अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनावर परिणाम झाला. अशा वेळीच आण्णांनी संघटन करण्याचे उत्तम कौशल्य आत्मसात केले.

आण्णांच्या जीवनामध्ये या वेळेपासूनच रचनात्मक कार्य आणि संघर्षाचे क्रांती कार्य यांची सांगड घातली गेली. विद्यार्थी दशेत असतानाच त्यांनी अनेक मित्रांची जमवा जमव केली.

राजर्षि शाहू महाराजांनी विविध समाजातील गोर-गरीब मुलासाठी शिक्षण व मोफत राहण्याची सोय विविध जातींची वसतिगृह स्थापून केली होती. आण्णांनी आपले सातवी पर्यंतचे शिक्षण वाळवा तालुक्यातील आष्टा या गांवी पूर्ण केल्यानंतर पुढच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग मध्ये आले. यावेळी कोल्हापूरमधील विविध समाजातील, जातीतील विद्यार्थ्यांची हळूहळू ओळख झाली. यावेळी स्वातंत्र्य चळवळीचे वारे वाहत होते या वातावरणामुळे अनेक विद्यार्थी भारावून गेले. एकत्र येवून सहभागी होण्यासाठी संघटीत झाले. त्यामध्ये नागनाथ आण्णांनी ही आपला खारीचा वाटा उचलला. आण्णांच्या बरोबर प्रामुख्याने रत्नाप्पा (आण्णा) कुंभार, वाय. सी. पाटील, नाना शेटे, माधवराव बागल, एम. ए. पवार, जी. डी. लाड, आण्णासाहेब पात्रवळे, वसंत दादा पाटील, बापूजी साळुंखे, तात्यासाहेब कोरे, भगवानराव पाटील इत्यादी विविध भागातून आलेले विद्यार्थी यांची या वसतिगृहात चांगलीच ओळख झाली. यांच्यामध्ये विविध गुण, कौशल्ये, धाडसीपणा, हुशारी अशा प्रकारचे गुण होते. अनेक जण कुस्ती, कब्बडी, खो-खो, दांडपट्टा अशा विविध खेळामध्ये तरबेज होते. यामुळे सर्वांचा सर्वांगिण विकास होण्यास मित्रमंडळी उपयोगी ठरली. याचा फायदा नागनाथ आण्णांनाही झाला. महत्त्वाचे म्हणजे आण्णांच्या मध्ये नि:स्वार्थी भावना जागृत होवून त्यांनी मित्र संघटन करण्याचे कौशल्य आत्मसात केले.

नागनाथ आण्णांनी विविध गुण, कौशल्ये, राजकारण, समाजकारण, सांस्कृतिक परंपरा हे सर्व आत्मसात करण्याची संधी मित्रमंडळीच्या समवेत मिळाली. स्वातंत्र्य लढ्याचे वातावरण असल्यामुळे घरातील वडिलांचा विरोध असतानाही शिक्षण सोडून देऊन स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले.

१९४०-४२ पासून खऱ्या अर्थाने अण्णांच्या जीवनात क्रांतीचे पर्व सुरू झाले. एखाद्या व्यक्तीची त्याग करण्याची वृत्ती बनली की, त्या माणसाला स्वत:बद्दल आत्मविश्वास वाढतो. असा आत्मविश्वास आण्णांच्या रक्तात निर्माण झाला. कोणताही विचार न करता बोर्डिंग मधील मित्रमंडळींनी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली. 'व्यक्तिगत पातळीवर मिळविण्यासारखे काहीच नव्हते, मिळवायचेही नव्हते, उलट क्षणाक्षणाला जीव गमावण्याचाच प्रसंग होता. मिळाले तर स्वातंत्र्य मिळणार होते. ते सर्व भारतीय जनतेसाठी.' (३) असा विचार करून आण्णांनी विविध थरातील सहकारी जमा करण्यास आरंभ केला. त्यानुसार आपली विचार प्रणाली निर्माण केली. सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या मूलभूत गरजा मिळाल्या पाहिजे हा तेजस्वी विचार आण्णांच्या मनात सतत होता व आजही आहे.

**नागनाथ आण्णांची विचारप्रणाली –**

नागनाथ आण्णानी कोल्हापूर मध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थी चळवळी मध्ये भाग घेतला. ही विद्यार्थी चळवळ सामाजिक जाणीवेची होती. त्याच बरोबर राष्ट्र सेवा दलाची चळवळही चालू होती. या दोन चळवळीतील प्रबोधनाचा लाभ आण्णांना झाला. आण्णांच्या मनात देशाच्या स्वातंत्र्याविषयी विचार निर्माण झाले. तसेच देशातील नागरिकांचा सर्वांगिण विकास व्हावयाचा असेल तर, चार बाजूंनी विचार केला पाहिजे. त्याप्रमाणे आण्णांनी आपले विचार स्पष्ट करताना राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून स्पष्ट केले आहेत.

नागनाथ अण्णा म्हणतात, ज्याप्रमाणे दोरीला चार पदर असतात. त्याप्रमाणे माणसाचे जीवन आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक या चार घटकांनी परिपूर्ण पाहिजे. माणसाचा विकास एकांगी होता कामा नये. यासाठी १९४२ सालच्या स्वातंत्र्य चळवळीपासून चार अंगांनी विकास करणारी चळवळ उभी केली. चळवळी मार्फत अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला आहे. ही चळवळ तीन घटकात विभागली. पहिला घटक असा की, भूमिगत चळवळीत रूहभाग घेतला. धुळे खजिना लुटून आझाद हिंद फौजेची स्थापना करून सैनिकांना स्वातंत्र्यासाठी प्रशिक्षण दिले. कारण 'आपला देश गुलाम आहे इंग्रजांचे राज्य घालविल्याशिवाय आपल्या देशातील बहुसंख्य असलेल्या कष्टकरी जनतेची दु:खे संपणार नाहीत. या

देशातून ब्रिटिशांची सत्ता घालविण्यासाठी जिवाची बाजी लावली पाहिजे.' [१०] अशा स्वरूपाचे आण्णांचे स्वातंत्र्या विषयी विचार आहेत.

दुसरा घटकाबाबत विचार स्पष्ट करताना आण्णा म्हणाले, सामुदायिक शेतीची मोहिम सुरू केली. १९४४ ते १९४६ या कालखंडात रयत शिक्षण संस्थेला एक लाख रूपयेचा दिला. शैक्षणिक विकास करीत असताना किसान शिक्षण संस्था स्थापन केली. कारण गोर गरिबांच्या घरातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना शिक्षणाची सोय गावातच व्हावी. ग्रामीण भागातील मुलांना जवळच पदवीपर्यंतचे शिक्षण मिळाले. त्यामुळे ही संस्था स्थापन केली. तसेच सांस्कृतिक विचार स्पष्ट करताना म्हणाले, 'ग्रामीण भागात दलित, आदिवासी, ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलने भरविली पाहिजेत. सांस्कृतिक उत्थानाची जाणीव ठेवून याचे महत्व समाजाला आहे. कारण काही हजार वर्षे ज्या बहुजन - कष्टकरी जाती-जमातींना ब्राम्हणी जाती व्यवस्थेने अज्ञानाच्या अंधारात जबरदस्तीने ठेवले. त्यांनी आजच्या काळात स्वत:ची क्रांतिकारक सांस्कृतिक परंपरा उभी केली पाहिजे. फुले, शाहू-आंबेडकर विचारांच्या, मार्क्सवादी विचाराच्या आधारावर स्वत:चे सकस साहित्य फुलविले पाहिजे. यासाठी पुन्हा सांस्कृतिक प्रवाह पुढे चालू ठेवला. तसेच विद्रोही साहित्य संम्मेलन हा एक सांस्कृतिक प्रवाहाचा भाग चालू ठेवला. ' [११]

तिसरा घटक असा की, १९९२ साली हिंदू-मुस्लिम बहुजनानी एकमेकांच्या कत्तली करण्यात या दुष्ट हेतूने 'या ब्राम्हणी जातीयवादी धर्मांध शक्तींनी बाबरी मशिद पाडण्याचे दुष्ट कृत्य केले. ऑगस्ट १९९२ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने निर्णय घेऊन शिवराज पाटील यांना लोकसभेचा उपाध्यक्ष बनविण्यासाठी काँग्रेसच्या खासदारांनी मते देण्याचा निर्णय घेतला. याच घटनेतून भाजप आणि संघ परिवाराने काँग्रेस सरकारचे अवसान घेतले आणि बाबरी मशिद पाडण्याचे धाडस केले.

या घटनेमुळे आण्णांच्या मनाला जिव्हारी लागले.' १२ तेंव्हा आण्णांनी जातीय धर्मांध शक्ती विरोधी विचार मांडताना म्हणाले, धर्मनिरपेक्ष अशी समाजव्यवस्था उभी केली पाहिजे. त्यासाठी बहुजन कष्टकरी जनतेचे शोषण संपविले पाहिजे. आणि राजकीय सत्ता कष्टकरी जनतेच्या हाती आली पाहिजे. भांडवलदारांकडून होणारी गुलामगिरी थांबविली पाहिजे. त्यासाठी जमिनदारी, भांडवलदार, जातीयव्यवस्थेचा अंत करावा लागेल. तरच समाजवादी समाज रचना अस्तित्वात येईल. त्यासाठी प्रथम ब्राम्हणवादाला विरोध केला पाहिजे. १९९२ साली युती शासनाच्या काळात बाबरी मशिद पाडली. याच्या निषेधार्थ वाळवे गावी मोठी मिरवणूक आयोजित केली आणि त्यानंतर बाळवे ते हुतात्मानगर या २० किलोमीटर अंतरात राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून एक प्रचंड मानवी साखळी संघटीत केली. विद्यार्थी,

शेतकरी, कामगार, कष्टकरी सलगपणे एकाचवेळी हातात हात घालून उभे राहिले आणि त्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा पुकार केला.' [१३]

तिसऱ्या बाजूंनी विचार केला असता नागनाथ आण्णांनी राजकीय विचार मांडताना म्हणाले, कष्टकरी, शेतकरी, ऊसकरी, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त यांचा विकास करण्यासाठी, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी राजकीय चळवळ उभी करून मूलभूत आर्थिक धोरणे बदलली तर आर्थिक व राजकीय अंगानी प्रत्येकाचा विकास होईल. त्यासाठी राजकीय दृष्टिने प्रत्येकाला मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच हुतात्मा किसन अहिर सहकारी कारखान्यामार्फत सहकारी क्षेत्रातील विविध संस्थाद्वारे जनतेचा विकास व्हावा. वाळवा तालुका व इतर तालुक्यांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक विकास व्हावा. त्याच बरोबर सामाजिक राजकीय चळवळ स्थिर करून, बहुजन समाजातील जनतेचे शोषण थांबावे. हा विचार करून करखान्याची स्थापना केली.

आण्णा पुढे म्हणाले, ''स्वातंत्र्यासाठी शेकडो हुतात्म्यांनी प्राणाचे बलीदान केले. स्वातंत्र्याच्या काळात अशाच प्रकारचा त्याग धरणग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी देशाच्या विकासासाठी केला. भांडवलशाही आणि ब्राम्हणी जातीयवादी व्यवस्थेच्या राज्यात आपण दु:खे भोगत असताना सुद्धा आपला जो विकास झाला. त्याला मोठ्या प्रमाणात धरणग्रस्तांचा हा त्याग कारणीभूत आहे. त्यांचे विकसनशील पुनर्वसन होण्यासाठी त्यांची चळवळ संघटीत करावी लागेल. त्यांची चळवळ बांधण्यासाठी आवश्यक ती आर्थिक मदत करणे हे आपले कर्तव्य आहे.'' [१४] कारण साम्यवादी समाज रचना अस्तित्वात आणण्यासाठी समाजातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, कामगार यांच्या समस्या सोडविल्या पाहिजेत. त्यांना राजकीय चळवळीमध्ये सहभागी करून घेतले पाहिजे. तरच समाजवादी समाज रचना अस्तित्वात येईल.

आण्णांचे समाजवादी समाज रचने विचार अभ्यासत असताना आण्णांच्यावर क्रांतिसिंह नाना पाटील यांचा प्रभाव होता. 'माझा शेतकरी राजा सुखी व्हावा.' ही अखेरची क्रांतिसिंह नाना पाटील यांची इच्छा पूर्ण करण्यासाठी आजही कार्यरत आहेत.

आण्णा म्हणतात, 'जनतेच्या खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या चळवळीच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टीचा, सर्व शत्रू शक्तींचा पराभव करीतच चळवळ पुढे न्यावी लागणार आहे.' [१५]

एकंदरीत आण्णांची विचार प्रणाली ही चळवळीच्या मार्फत परिवर्तनवादी चौकटी मध्ये न बसविता त्यांच्या विचारांची झेप ही कोणत्याही तत्वज्ञाना मध्ये न बसता, आण्णांनी जनतेचे विचार येथे हुतात्मा चळवळी मार्फत मांडलेले दिसतात. त्याप्रमाणे आपल्या कार्याला सुरूवात केली.

## संदर्भ सूची


१. शांताराम गरुड, भारताचा स्वातंत्र्य संग्राम - प्रमुख प्रवाह : सामर्थ्ये : कमजोऱ्या. प्रबोधन प्रकाशन : समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, पान नं. १ व २

२. प्रा. मल्लिनाथ अंजुनगीकर, प्रा. सुभाष पाटील. भारताचा स्वातंत्र्य संग्राम - प्रमुख प्रवाह : सामर्थ्ये : कमजोऱ्या. प्रबोधन प्रकाशन : समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, पान नं. १९

३. गोखले पु. पा. 'जागृत सातार' आवृत्ती द्वितीय १९६६. पृष्ठ क्र. ४७

४. डॉ. भारत पाटणकर 'क्रांतीवीर नागनाथ नायकवडी' प्रकाशक श्री. वसंतराव पवार, फेब्रुवारी, १९९६ , पान नं.१

५. सा. बा. सनदे 'जीवन संग्राम' राही प्रकाशन, आष्टा, जून, १९८४ पृष्ठ क्र. ५३

६. डॉ. भारत पाटणकर, 'क्रांतीवीर नागनाथ नायकवडी' प्रकाशक श्री. वसंतराव पवार, फेब्रुवारी, १९९६ , पृष्ठ क्र.१

७. डॉ. भारत पाटणकर, 'क्रांतीवीर नागनाथ नायकवडी' प्रकाशक श्री. वसंतराव पवार, फेब्रुवारी, १९९६ , पृष्ठ क्र.२

८. उपरोक्त , पृष्ठ क्र. ३

९. उपरोक्त , पृष्ठ क्र.३

१०. उपरोक्त , पृष्ठ क्र.२

११. उपरोक्त , पृष्ठ क्र.२७

१२. उपरोक्त , पृष्ठ क्र.२४

१३. उपरोक्त , पृष्ठ क्र.२४

१४. उपरोक्त , पृष्ठ क्र.२३

१५. उपरोक्त , पृष्ठ क्र.२८